**ONE DAY WORKSHOP ON BIODIVERSITY CONSERVATION: 17/02/2020**

**Under Lead College Scheme, Shivaji University, Kolhapur.**












# मानवामुळे जैवविविधता धोक्यात : डॉ. बाचूळकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

मानवी हस्तक्षेपामुळे जागतिक पातळीवर उदा. ऑस्ट्रेलियातील जंगलातील वणवा यासारख्या गंभीर घटना घडत असल्यामुळे मानवाने जैवविविधतेचे संरक्षण करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन माजी प्रा. डॉ. मधुकर बाचूळकर यांनी केले. यावेळी त्यांनी जागतिक स्तरावरील जैवविविधतेची सविस्तर माहिती देऊन सध्या मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून संवर्धन करण्याची गरज असल्याचे सांगितले.

गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभाग व बी. व्होक सस्टेनेबल ॲग्रीकल्चर मॅनेजमेंट विभागाच्या वतीने संयुक्तरीत्या बायो डायव्हर्सिटी कॉन्झर्वेशन विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा मोठ्या उत्साहात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पी. के. पाटील होते. स्वागत व प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. पी. जाधव यांनी केले. प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य डॉ. मधुकर बाचूळकर यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

प्रथम सत्रात बोलताना माजी प्राचार्य डॉ. मधूकर बाचूळकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर दुसऱ्या सत्रात बोलताना प्रा. डॉ. मकरंद ऐतवडेकर यांनी कोल्हापूर जिल्ह्यात असणाऱ्या जैवविविधतेचा आढावा घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून दुर्मीळ वनस्पतींचा शोध घेऊन त्याची नोंद करण्यात येत असून, लोकांच्यामध्ये वृक्ष संवर्धनाची चळवळ रुजवण्याचा प्रयोग कौतुकास्पद आहे, असे मत याप्रसंगी व्यक्त केले. तृतीय सत्रात बोलताना प्रा. डॉ. मानसिंग निंबाळकर यांनी विद्यापीठातील लीड बोटॅनिकल गार्डनचे महत्त्व विशद करून जैवविविधतेचे फायदे -तोटे सांगितले.

कार्यशाळेत विविध महाविद्यालयांतील ६४ विद्यार्थ्यांनी व १५ सहयोगी प्राध्यापकांनी सहभाग घेतला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सहभागींना प्रमाणपत्रे देण्यात आली. कार्यक्रमास शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई, पेट्रन कौन्सिल मेंबर दौलत देसाई, प्रशासन अधिकारी प्रा. डॉ. मंजिरी मोरे यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. पी. के. पाटील, उपप्राचार्य एस. एच. पिसाळ, मृणालिनी देसाई, श्रुती पाटील, सी.पी. डी. आवटे, सी.टी.एस. पाटील आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सी. फडणवीस यांनी केले.





# मानवी हस्तक्षेपामुळे जैवविविधता धोक्यात

प्रतिनिधी
कोल्हापूर

- डॉ. मधुकर बाचुळकर यांचे मत
- गोखले कॉलेज आयोजित बायो डायर्व्हसिटी कॉन्झरवेशन कार्यशाळा

जैवविविधतेत दिवसेंदिवस मानवी हस्तक्षेप वाढत चालला आहे. वृक्षारोपण करण्याऐवजी वृक्षतोडीवर जादा भर दिला जात आहे. ऑस्ट्रेलियात जसे जंगलांना आगी लागल्या जातात, तशा आगी भारतातील जंगलांना लागणार नाहीत, याची खबरदारी घेणे नितांत गरजेचे झाले आहे. मात्र खबरदारीच घेतली नाही तर सध्या जितका जैवविविधतेला धोका पोहोचला आहे, त्याच्या कितीतरी पटीने धोका वाढेल, अशी भिती प्राचार्य डॉ. मधुकर बाचुळकर यांनी व्यक्त केली.

गोखले कॉलेजमधील वनस्पती विभाग व बी. व्होक सस्टेनेबल ॲग्रीकल्चर मॅनेजमेंट विभाग यांच्या वतीने आयोजित केलेल्या बायो डायर्व्हसिटी कॉन्झरवेशन विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. रोपाला पाणी घालून कार्यशाळेचे पर्यावरणपूरक उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी गोखले कॉलेजचे प्राचार्य डॉ. पी. के. पाटील होते. कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांना निमंत्रित केले होते. त्यांना डॉ. बाचूळकर यांनी जगातील जैवविविधतेची सविस्तर माहिती सांगितली. तसेच भारतात युद्धपातळीवर वृक्षलागवडीची मोहीम राबविणे गरजेचे असल्याचे विशद केले. प्रा. डॉ. मकरंद ऐटावडेकर यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील जैवविविधतेचा आढावा घेतला. प्रा. डॉ. मानसिंग निंबाळकर यांनी शिवाजी विद्यापीठातील लीड बोटॅनिकल गार्डनचे महत्व विशद करत जैवविविधतेचे फायदे पटवून सांगितले.



यावेळी गोखले कॉलेजचे उपप्राचार्य एस. एच. पिसाळ, प्रा. डॉ. मृणालिनी देसाई , प्रा. श्रुती पाटील, प्रा. पी. डी. आवटे, प्रा. टी. एस. पाटील आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. आर. पी. जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. आर. टी. पाटील यांनी आभार मानले.

**CERTIFICATE DISTRIBUTION TO PARTICOPANT IN WORKSHOP**





# STUDENT CENTRIC ACTIVITIES: 2019-20




**Open Book Test On 25/09/2019 of Class B.Sc. I**







**Student Seminar on 21/01/2020 to 25/01/2020**

# Department of Botany Extension Activities: 2019-20

## Tree Plantation at Kagal Campus on 30/07/2019









**Nature Walk at Lead Botanical Garden Shivaji University in collaboration with Maharashtra Times News Paper on 13/01/2020**









**Botanical Excursion at Lead Botanical Garden Shivaji University on 9/03/2020**









# ICT Lectures 2019-20








ICT Lecture by Dr. R. T. Patil on 15-10-2019




Zoom Lecture by Dr. R. T. Patil on 30/04/2020 & 3/05/2020